# शलाका

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २३२६

REFBK-0021987
REFBK-0021987

अशोक हराळे

वि. क्र.
२३२६
॥ श्री ॥
२१९८८
१६।१२।८८
काव्य

# शालाका

२३२६ काव्य
२१९८८

## अशोक हराळे

REFBK-0021987
REFBK-0021987

'प्रसाद प्रकाशन' मुंबई

'प्रसाद' प्रकाशन
प्रथमावृत्ती :
ऑक्टोबर १९७७

वेष्टण :
श्री. डी. एल. गावडे


प्रकाशक :
श्री. वासुदेव पै
प्रसाद प्रकाशन,
दत्तगुरु सेवाश्रम,
८१, एस. वी. रोड
मालाड, मुंबई–६४.

मुद्रक :
प्रसाद प्रिन्टर्स,
दत्तगुरु सेवाश्रम,
८१, एस. वी. रोड,
मालाड, मुंबई–६४.

मूल्य : पांच रुपये

कविवर्य राजा बढे व बंधु अरविंद

ह्यांच्या स्मृतीस—



Discretion is the Salt and Fancy the Sugar of life,
The one Preserves and the other Sweetens it.

# प्रस्तावना—

अशोक हराळे हा माझा कॉमर्स कालेजातला विद्यार्थी. पहिलीच ओळख पटली ती त्याच्या मनाची. हळव्या मनाच्या ह्या तरूणावर प्रथम दर्शनीच माझं लक्ष केंद्रीत झालं. नवशक्ती युथ फोरम सारख्या व्यासपिठावरून तरूणांच्या ज्वलंत समस्येवर कार्यक्रम आखणे ते घडवून आणणे तसेच नवनविन कार्यक्रम सादर करण्यासाठी त्याचे प्रयत्न चालायचे म्हणून मी कॉलेजमधल्या साप्ताहिक साहित्य पथ पत्रिकेची संपादनाची सूत्रे त्याच्याकडे दिली. उंच अशा ह्या मुलाचे डोळे दूरवर कुठेतरी कांहीतरी शोध घेत असायचे. ध्येयासाठी धडपड करणं ही त्याची जिद्द होती.

आणि अशा ह्या अशोकचा मला फोन आला. सर ! माझा काव्यसंग्रह प्रकाशित होतोय मला आपली प्रस्तावना हवी आहे. मी खुष झालों आणि मला त्याचं कौतुक वाटलं, आता हे नुकतच वयात आलेलं पोर खऱ्या अर्थाने भरारी मारत आहे ह्याचं. त्याच्या बऱ्याच कविता मी वाचल्या होत्या. त्याची कविता ही एक प्रकारची उमेद घेऊन येते. उमेद दोन प्रकारची आहे. वैफल्याची आग आणि साफल्याची उब दोन्हीचाही तीत समावेश आहे.

आज अमुच्या गरीबीचे चालले विडंबन
कशी वदावी कुणाशी ही कहाणी करूण
......म्हणता म्हणता तो पुढे म्हणतो
कलीकालाच्या माथ्यावरती पाय देउन
उभे राहीलो आता
मरगळलेल्या घडीला शलाकेचा आधार समजून

आणि अंधारातून कुठे तरी प्रकाशाची तिरीप दिसते. कांही कांही वेळा तो असा जीवंतपणा वास्तव शद्वात उतरवतो की,

काळवंडलेल्या कातरवेळी
भकाभक निश्वास टाकत असलेली खोपटी
जीवनाच्या वणवणतेनं शुष्क बनलेली रोपटी
मायेपोटीं सुखाचा घास
कधी न मिळालेली हाडाकाष्टाची पोरं
आशेच्या पोटी जिभळया चाटणारी ढोरं

परिस्थितीचं जीवंत चित्र उभं करतो. समाजातील गरीब जीवाबद्दल वाटणारी कळकळ, उद्वेग ह्याच्या मनस्थितीचं ह्यात दर्शन घडतं.

अनुषंगिक उथळपणाचा लवलेशही न ठेवता आपल्या तरूण मनाचं दर्शन घडविताना कांही कांही रचना त्याने फार मधुर केल्या आहेत. अंतरीच्या ओढीनं, अनुभूतीच्या गोडीनं म्हणा आणि मुक्या शब्दांच्या जोडीनं तो आपलं गुपित सांगतांनां म्हणतो,

शब्दांच्या धनुष्याने, मारले नजरेचे तीर
नजरेस नजर मिळता, भरले डोळयात ग नीर
आठवणीच्या शब्दांचा, वहात आला ग पूर
मिटताच का पापण्या, त्यात भिजलें ग सूर
किती म्हटले क्रूर, तरी जाईना नूर
लागते बघ सारखी, मला तुझीच हुरहूर

...... व आपली व्यथा कुणाला तरी सांगतो. कांही कांही वेळा त्याच्या शब्दरचनेत एक प्रकारची गोडवी येते.

दुरून मी जातसे, हे तुलाच का ग भासे
तुझिया चित्ती फुलोरा, फुलात मी ग हासे

त्याच्या एका कवितेत तो म्हणतोच आहे कीं,

जेव्हा तुझ्या सुरांना, माझ्या गीताची साथ असते
तेव्हांच एक कविता, तुझ्यारुपी मला दिसते

त्याचं प्रेम हे प्रेयसीवरील असो वा समाजावरील निसर्गाची ओढ व अन्यायाची चिड ह्यांची ओळख त्याच्या भावनेच्यां आविष्कारातून जाणवते.

शब्द हे काव्याचं सामर्थ्य. शब्दावर स्वतःची प्रतिमा उमटवून प्रतिभा जागवणं असं सगळयांनाच जमत नाही, कांही काही वेळा त्याच्या कवितेच्या अनुभूतीत आणि त्याच्या शब्दकलेत अशी कांही खासीयत येते की कौतुक केल्यावाचून रहावत नाही. भावनामय आशयानं भरलेलं त्याच्या कवितेचं अंतरंग ( आणि त्याचेसुद्धा ) त्याच्या बव्हंशी कविता त्या जाणिवेतून उमटलेल्या आहेत आणि त्या कवितांना एका नवोन्मेषी प्रतिभेचा स्पर्श लाभला आहे. आणि म्हणूनच मी अशोकच्या पहिल्या वहिल्या साहित्य कृतीच्या भावी यशाबद्दल पूर्णपणे निश्चिंत आहे. माझ्या मनोमन शुभेच्छा, आशिर्वाद त्याच्या पाठीशी आहेत. अशा या ध्येयवादी तरूणास मी एवढंच म्हणतो कीं, ब्राव्हो—आगे बढो !

— प्रा. अनिल थत्ते

# मनोगत—

आज माझं हे पहिलं वहिलं पुष्प घेवून मराठी साहित्याच्या दरबारात पाऊल टाकताना मनाला मिळणारा आनंद शब्दात व्यक्त करणं मला अवघड झालं आहे. आजपर्यंतच्या माझ्या जीवनात जे कांही पहावयास मिळालं, अनुभवास आलं आणि त्याच्यामुळे माझ्या मनाला जे कांही बोचलं, संवेदना उमटल्या त्यांना मी शब्दरूप दिलं.

जीवनात येणाऱ्या खाचखळग्यांच्या धक्यानं प्रसन्नता फुलते आणि असं प्रसन्न अंतःकरण एकाग्र होऊ लागलं कीं नवनवोन्मेषशालिनी प्रज्ञा जन्माला येते किंवा कधीकधी शोकदुःखाच्या आसूड मारानं बेशुद्ध झालेलं मन हळूहळू जागं होताना शुद्धी-बेशुद्धीच्या संधिप्रकाशात कुठे तरी सत्याची सुवर्णरेखा गवसते आणि प्रतिभा हासते.

माझ्या ह्या कामगिरीचे माझ्या अनेक सहकाऱ्यानी व आप्तांनी लडिवाळपणे कौतुक केलें. कौतुकाच्या ह्या भावनेपोटी माझ्या कविता आज संग्रह रूपाने प्रसिद्ध होत आहेत.

प्रेम मग ते एखाद्या व्यक्तीवरील असो वा समाजावरील, साफल्याची उब नि वैफल्याची आग सारखीच प्रभावी असते दोन्हीं ठिकाणचीं.

आपल्या कलागुणानी दिव्यत्वाचा स्पर्श देवून आजुबाजूला आनन्द उधळणारा प्रेमळ कलावंत, आपल्या बुद्धिवैभवानं नि संशोधन चातुरीनं समाजसुखाची अभिवृद्धि करणारा बुद्धीमंत, गाजावाजा न करता मिटल्या तोडानं आणि स्वाभाविक सहृदयतेनं समाजदुःख दूर करणारा समजूतदार समाजसेवक आणि या सर्वाचीच ध्येयोन्मुख परिश्रमशीलता मला नेहमीच मुग्ध करते. माझे लडिवाळपणे कौतुक करणारे राजा बढे, तीन चार वेळा त्यांच्याबरोबर मी कविसंमेलनात भाग घेतला होता. गोरेगांव कामगार कल्याण केन्द्रात कविसंमेलनाच्या निमित्ताने त्यांची नि माझी झालेली ओळख आणि त्यानंतर त्यांचा मला लाभलेला सहवास विसरणे शक्य नाही. असो.

स्वान्तसुखासाठी केलेल्या या रचनांमुळे कोणा एका हृदयाच्या तारा झंकारल्या तरी प्रसिद्धीचा हा खटाटोप सार्थकी लागला असं वाटेल.

ज्या मित्र सुहृदांच्या प्रेमामुळे हा योग आला त्यांचा मी ऋणी आहे. मला सहकार्य करणारे प्रा. अनिल थत्ते, प्रा. शंकर वैद्य, सत्यकथेचे राम पटवर्धन, नाट्यमंदारचे राजाराम शिंदे, महाराष्ट्र विद्यालय, गोरेगांवच्या मुख्याध्यापिका सौ. मंगला उपाध्ये, प्रकाशक वासुदेव पै तसेच माझे सहकारी मित्र श्री. विश्वेश सावरकर, श्री. विनय पुरव, श्री. सदानंद राणे, श्री. दत्ता सावन्त आणि माझी मित्रमंडळी तसेच जन्मदाते आदि कुटुंबीय मंडळींचा मी कायमचा ऋणी आहे.

— अशोक

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| मार्ग | १ | वेडी आशा | २६ |
| थाप डफावरी मार शाहीरा | २, ३ | आलाप | २७ |
| विठ्ठल ( भक्तिगीत ) | ४ | आभाळ पाऊस | २८ |
| नातं | ५ | चन्द्र माझा | २९ |
| माझ्या आकाशीच्या बापा | ६, ७ | शलाका | ३०, ३१ |
| ध्येय | ८ | माझ्या माधवा श्रीधरा | ३२ |
| विसावा | ९ | निरोप | ३३ |
| उघडीप | १० | एका कवितेस— | ३४ |
| मुक्ती | १० | हृदयामधील देवा | ३५ |
| क्रांती | ११ | थांब पोरटी | ३६ |
| ज्वालामुखी | १२, १३ | गुपित | ३७ |
| मानवाचा सहवास | १३ | अस्मिता | ३८ |
| निसर्ग सौंदर्य | १४ | नाही कळायचा अर्थ | ३९ |
| साज उभयता | १५ | संजीवन | ४० |
| हे भाव वेडे | १६ | संकेत | ४१ |
| जागृती | १७ | मी | ४२, ४३ |
| स्मृती | १८ | प्रीती | ४४ |
| ध्येयपथ | १९ | मनोगत | ४५ |
| पुस्तक वाचन अर्थात समाधी भंग | २० | तेच खरे वीर | ४६, ४७ |
| | | देवाचं देणं | ४७ |
| माझी शाळा | २१ | जेव्हां तू रुसतेस— | ४८ |
| आधार | २२ | परीक्षा तुझ्या अस्मितेची | ४९ |
| आव्हान | २३ | रुसवा धरूनी | ५० |
| गुरुजनांचे ऋण | २४ | वेडी कुठली | ५१ |
| मिलन | २५ | हृदय हवे मज | ५२ |

# मार्ग

अशीच एक वाट होती
धुळीने मरखटलेली
पत्थराने लडबडलेली

माझ्या वाटेवरच्या खाणाखुणा
नियतीचे भूयार
नानाचिये भयंकर

सदा काट्याचीही वाट
तरी न मज खंत
चाले मी निवान्त

अचानक ही बाधा
आली माझ्या वाटेला
ठेच लागली पायाला

लोकमान्य धिरोदात्त
आठवले त्यांचे नाव
उभा काढुनिया ताव

विव्हळतेच्या खुणांनीं
अंग माझे शहारे
उजळ मनाचे निखारे

आज माझ्या वाटेवरी
केली डांबराची मळणी
दिसे नागमोडी वळणी

माझ्या वाटेचीही ओढ
जरी धुक्यांची पागोटी
चिर-स्मर गाठीभेटी

## थाप डफावरी मार शाहीरा

थाप डफावरी मार शाहीरा
थाप डफावरी मार
उद्रेक कलीचा द्वेष माजला
माजला जगी अंधार

शौर्याची होते हातोटी
माणूसकीची इथे कसोटी
एक एक ते सत्य फोडोनी
वीर मर्दानी वाणी काढोनी
सात युगाचे सात चौघडे
नको कशाची हार
— थाप डफावरी मार

मनी मनाच्या फुलल्या गाथा
काय सांगू मी तुज रे आता
जीव जगविणे कठीण झाले
गेले जळुनिया घरदार
माणुसकीला जीवन देण्या
सोडा जीवन धार
— थाप डफावरी मार

मायभूमीही भिजली रक्ता
बघ माणुसकीच्या तू रे भक्ता

तू तरी मृदू हृदय बनोनी
बन जीवनी तया आधार
गा गुणगान दीनतेचे
कर श्रीमंतीवर वार
—थाप डफावरी मार

धडपडे कोवळे जीव
बनव तू तया सजीव
रक्ताची ही चाड ठेवूनी
बना तुम्ही दिलदार
रिपू, दैन्य, विषमता यांचा
करा आता धिक्कार
—थाप डफावरी मार

# विठ्ठल [भक्तिगीत]

पंढरीची वाट माझी
चंद्रीकाची लाट बाई
    संसाराची भरभराट ...

चंद्रीकाची ओटी भरते
श्रीफळांचीं रास बाई
    ही पंढरीची वाट... ..

विठ्ठल विठ्ठल नाम स्मरण्या
वाहते स्विय आस बाई
    ही पंढरीची वाट .....

पूजा अर्चि मग्न होता
मागी कृपेची ठेव बाई
    ही पंढरीची वाट......

पूर्ण करी आस माझी
हा पंढरीचा देव बाई
    ही पंढरीची वाट ...

## नातं

मेघावाचून वीज कधी
वरीते का कुणा ?
चाफेकळीं फुलली
का चाफ्या विना ?
सागरा सोडूनी कुणा
मिळाली कां गंगा ?
मुक्ता सोडूनी राजहंस
येईल का रतिरंगा ?
चंद्राविन पद्म फुलले
आजवरीं न कुणी ऐकले !
काट्यावाचून गुलाब
आज का कुठे उमललें ?
गीत संपदा उजळूनी
प्रतिभा ही जागली !
काव्य हे जीवनाचे
म्हणूनी ही कविता स्फुरली !

# माझ्या आकाशीच्या बापा

माझ्या आकाशीच्या बापा
    किती मारशील थापा
टाकल्या या अजाण जीवाने
    अनेकवार धापा
गहाण ठेवली तुझ्याकडे
    मी माझ्या व्यथेची बुज
का घोंगावतो वारा
    करण्या माझ्याशी हितगुज
दे निजसुख एकदा
    माझ्या तू रे अनंता
बाकी कांही नको मज
    घे एकदाची पापा
    माझ्या आकाशीच्या बापा

काजळ तुझ्या स्मृतीचे
    अखंड भरले मी नेत्री
फुलव फुलांचा फुलोरा
    तू माझ्या रे गात्री
नको देवू ढकलून
    या वाळवंटी एकटा
कवटाळून छातीशी
    घे एकदाची पापा
    माझ्या आकाशीच्या बापा

उजाड रानामधले वाटते
    चिटपाखरूही भयंकर
मग का देतोस वेदना
    बघ उठलेही चित्कार
सोड हा नियतीचा
    असा सारा खेळ छुपा
घे एकदाची पापा
    माझ्या आकाशीच्या बापा

लहानपणी माझी आई
    गायची अंगाई
आज शहाणे बनल्यावर
    मी म्हणतो अग आई
मातृत्वाचं प्रेम कसं
    अखंड एक नातं असतं
मायेच्या आवेशाच
    प्रेम ते सोज्वळ असतं
एवढं नातं असून सुद्धा
    भरली का मनी चिंता
    घे एकदाचो पापा
    माझ्या आकाशीच्या बापा

# ध्येय

आई ! आई !! कुठे मी आहे ?
का मला वाऱ्यावर सोडलेस ?
नाही ! तू नाही सोडलेस !
नियतीच माझी कठोर झाली
वैराणाचे भुषण ल्याली
उभा असा मी तडफडतोय
डसणाऱ्या उन्हांच्या गर्दीत
उगीच कुठेतरी हळहळतोय
सद्या ! मागे फिर काय कुणाची वाह
ठिकऱ्या मस्तकाऱ्या उडती माझी राह !
हिरमुसलेले सारे माझे काय सार ह्या जीवनी
सार घेऊनी मायेपोटी वणवण रानोमाळ
कुंठीत बसलो, सचिंत झालो
डोहामध्ये बुडून बुडलो
वेदनांनी कंबर बांधली, मेतकुटी होऊ घातली
तरीही न डगमगलो, टाकला निश्चल पाय
स्वानुग्रहे दुःखे हरपली –
करीता माय ! माय !!

# विसावा

जीवाची जीव घेणी कळ सोसून
मी नीतीला हाका मारीत असतो

कुठल्या एका संध्याकाळची स्मृती
जाग घेऊन माझ्यामागे दौडत असते

मी हताश होऊन पडणार असतो
तोच कुणीतरीं आधार दिलेला असतो

मी पाठी वळून बघणार तोच
मला धक्का देणारं कुणीतरी असते

पुढची मागची भिस्त न ठेवता
माझा मी अखंड दौडत असतो

सुख दुःखाच्या मनोव्यथानं
काळयाकुट्ट अंधारी तडफडत असतो

तोच माझ्या स्मृतीला साथ देणारं
जागवणारे कुणीतरी असते

त्याचवेळीं एक कळ शरीरातून
उभी चालून गेलेली असते

घायाळ मनाला विसावा देण्यास
कुणींतरी पांघरुण घातलेले असते

## उघडीप

पंछी हळूच उडले
फुलले मना पिसारे
माझिया धुंद हृदयी
का शिरले गार वारे
जीवित ओले झालें
सौभाग्य या क्षणाचे
वाजती पैंजणेहीं
करी कौतुके मनाचे

## मुक्ती

आसक्ती ना सक्ती
पुन्हां पुन्हां ही पुनरावृत्ती।
जरी वाचा मनी कृती
सर्व काही सांगे श्रुती।
नवनवलाईचीं काढूनी युक्ती
त्यात मी मिळविली मुक्ती।

# क्रांती

नसानसातून खेळत आहे रक्त
उद्याची क्रांती घडवायला
समाजवादाचे ढोल बडवायला
केले होते तुझ्या बापाने पाप
म्हणून भोग तू हा ताप
मग तू आणि तू
तुला कोणी राहाणार नाही
आपलं म्हणणारं श्वापद
जोपर्यंत तुझ्या नसा उष्ण आहेत
तोपर्यंत तू धडपड बाबा धडपड
तू दीग्मुख झालास ढीला पडलास
तर मात्र हे कावळे
आहेत चावा घ्यायला
तुझ्या मढ्याचा
मग मात्र तू जीवंत असून मेल्यात जमा
सगळ जीवन तुझं फुक्कट जाईल
आपल्य बापजाद्यांना शिव्या देत

# ज्वालामुखी

बिनधास्त धतींग करावी
धाडधींग धींगाणा घालावा
येताच कोणी फक्कड ठोसा हाणावा
अरे ह्या दळभद्री कार्ट्याला
त्या शिवाय समाधान वाटणार नाही
तुम्ही लाख शिव्या देवो
मी मागे हटणार नाही
हात लावाल अंगाला, तर हे बी
नरडीचा घोट –
घेतल्याशिवाय रहाणार नाही
हा संसार
सुखानं जगु देणार नाही
बाबा गाफील राहू नकोस
मेल्यांनो ! जातच तुमची हलकट
म्हणून आम्हाला उघड्यावर टाकलं
पण लक्षात ठेवा पामरानो !
हे गधडे वीर
उभे आहेत आग घेऊन
तुमचे भस्म करायला

चल उठ बाळा हा घे दगड
आणि घाल त्यांच्या डोक्यात
कर त्यांचा चेंदामेंदा
मग तुझा चेंदामेंदा झाला तर चालेल
तुझी प्रेरणा घेऊन दुसरा तुझ्या जागी
जन्म घेईल
ह्या साल्यांचा बीमोड करायला

## मानवाचा सहवास

मानवाचा सहवास
हो हा मानवाचा सहवास ।
इथे असा हा पथिक भुकेला
घडे तया उपवास ॥
सौख्य सागरी हिरे माणके
बने श्रीमंताचा दास ।
काय अभागी हा बैरागी
घडे तया वनवास ॥
हृदय द्रवित घर्म अंगात
नची ऐश्वर्याची आस ।
जीव जगविण्या पोट भरण्या
करीतो जग प्रवास ॥
कंपित जीवन चाले जर क्षण
बंद रे होईल श्वास ॥

# निसर्ग सौंदर्य

निसर्ग सौंदर्य सौंदर्य
सौंदर्य मज रे भुलवी
मज चमत्कार दाखवी
सौंदर्य निसर्ग सौंदर्य
कसे पहा उमलूनि हे येते
मज पहाता भाराउन जातें
कसे जुळले रे माझे
तयाशी अजोड प्रेमी नाते
सौंदर्य निसर्ग सौंदर्य
मम हृदयात साचे
हृदयात ते राहोनी
सार्थक करी जन्माचे
सौंदर्य हे हर्षाचे
हर्ष ते मना देते
मजबरोबर खेळोनीं
हर्ष भावना फुलवितें
सौंदर्य हेची सौंदर्य

## साज उभयता

साज उभयता साथ देती
निळया कुरणी रातकिडे
फुलाफुलांतून मधु संचिती
तुझे नि माझे हातकडे
नयनातुनी आसु येता
उषःकालचे दिव्य घडे
उद्विग्नतेची बाधा येता
मोह प्रीतीचा चित्तीं पडे
भावसुमांनी ओंजळ भरुनी
करांत कर गुंफू गडे
वाळूमध्ये रेघा मारुनी
गिरवू प्रीतीचे धडे
एक दिस नची दिसता तू
तुजविण मज न चैन पडे
पडती अमृत धारा
नभी वाजती चौघडे

## हे भाव वेडे

दूरुन मी जातसे, हे तुलाच का ग भासे
तुझिया चित्ती फुलोरा, फुलात मी ग हासे
हुंगीत गंध त्याचा, धुंदीत गुंग झालो
वेड्यागणिक फिरलो, आणि मलाच हसलो
तु गे वदली फुले हासली, मधुकर का ग भुलले
आणि उषेच्या तिर्थासाठी, गुणगुण का गुणगुणले
वाहतो झुळझुळ वारा, फुलवित मार्ग सारा
नकळत चालत मंत्रमुग्ध मी, आलो तुझ्याच द्वारा
कसा आलो मी प्रश्न पडे, अन् अवचित कांही घडे
ह्या प्रश्नाला उत्तर कसले, मिठी अलगद गळी पडे

# जागृती

सुमनांची ही रास भूवरी वरती का मग तारे
दिशादिशाशीं हितगुज करण्या देती वारे इशारे
आज चंद्रमा इथे कलला
बाग बगीचा तिथे फुलला
स्मृती गंध तो मागे उरला
ह्या स्मृतीतही चैतन्याचे, उजळे तेज क्षितीजी सारे
गाढ उरी त्या स्वप्नामधली
नभांगणी प्रीत जागली
भविष्याचीही ओटी भरली
त्या भविष्यातही चैतन्याचे सरतील पुढती वारे
साद अनोळखी साथ घेऊनी
तुझ्या स्मृतीचा हात होऊनी
चिर स्मृती मागे ठेऊनी
उंच उंच त्या उंचावरली उघडतील द्वारे

# स्मृती

ओठी मधुचा प्याला देता
धुंद आसवलेल्या नयनी
नयनी प्रतिमा प्रतिमेत दैव
का भविष्य माझीया अंजनी ?
रेखिव स्वप्नागणिक भविष्य
हळूच अंजनानी आखियले
कां तडजोड मनाला पडली
क्षणि मम देहभान लोपले
कां प्रखर दूत किरणच माझीया
स्वप्नान्तरि रिगाला
उमेद ही हर्षाची बाळगण्या
हा पथिकच मजशी लाभला
ए ऐसाच बहरूनी सदा
माझिया ओलावलेल्या चित्ती
नव तारूण्याचे बीज रोवले
नित्य दरवळल्या मनी स्मृती

## ध्येयपथ

पंचू तुझी रे चंचू उघडी काय मागशी मजशी गड्या
वाहे तुजला वात्सल्य तुझे रे  मार गड्या रे मार उड्या

फुलासवे हे फुलले सुमन
करू लागले मधु गुणगुण
मोहामध्ये बुडले तनमन

जागृतिचा उषःकाल घालीतसे हिरव्या कुरणी घडया
दाणा दाणा टिपती वणवण
हर्ष भरोनी मग मनोमन
वात्सल्याला देऊनी शिकवण

उमड बागडत येती कोठरी तोडूनी द्वेषाच्या कडया
थोर विभुतीचे झाले चंदन
सदैव कर तू तया वंदन
सद्भाग्याचे करूनी सिंचन

उडूनी उषःकाली झरकन् जा तू वरती जा फाकडया

## पुस्तक वाचन अर्थात समाधीं भंग

मी पुस्तक वाचण्या बसे
मम चित्त न तेथे वसे
खेळण्या मित्र येती बोलविण्या
सामना क्रिकेटचा आहे सांगण्या
पण बाबांचे मज होते सांगणे
न पूर्ण करी ते माझे मागणे
मज तंद्रीं लागुनी पुस्तकांत दिसे
क्रिकेटपटू षटकारे मारीतसे
शेवटी मज आला कंटाळा
पुस्तकात दिसे उडालेला त्रिफळा

## माझी शाळा

ही शाळा माझी प्राण
ठेवीन तिचा मी मान
मज शाळेविषयी आहे सदा अभिमान
अज्ञानातूनी करूनी वाटचाल मिळविले मी ज्ञान

कणकण विद्येचा केला गुरुनी दान
स्फूर्तीचे अमुच्या तेच खरोखर स्थान
शत प्रणाम त्यांना घेऊनी त्यांची आण
विद्येचे माझे केंद्र असे हे जगती नित्य महान
सच्चारित्र्याचे नम्रपणे नित गाईन मी गुणगान

तम अज्ञानाचा होत इथे विच्छिन्न
कर उधळी अपुरे ज्ञानरवि संकीर्ण
जणू कल्पद्रूम हा सन्मार्गी संपूर्ण
स्मरू नित्य उपकार वाढवू निरंतर ज्ञान
विद्येचीही खाण घेता लुटूनी नसे कशाची वाण

## आधार

शलाकेचा स्विकार
न पुन्हा वारंवार
म्हणुन ही शलाका
माझी बनली आधार
ना खन्त कशाची
ना भीति उद्याची
म्हणून जिने मजला
दाविले जिंदगीचे सार
त्या जिंदगीतही वैपुण्याची
भरती होतीच झाली
तिने मला त्यातही
जिंदगी सुखाची दिली
अशी लाख दुःखे आली
माझीया वहात्या जीवनात
पण जिने मगळ्यावर
केली मातची मात
नाही मी बनलों निष्फळ
की ज्याचे हे फळ
आली दुःखे अनामिक
पण जीच ही सर्वस्वी बळ
हवा दारुण्याची
वहास्त होती सदा
जिने घेतले कडेवरी
ह्या मार्गातही सर्वदा
ये शलाका माझिया हृदयीं
तू आवर्त जीवनाचे
ढकलूनी अंधाराला तू
बनविलेस गीत मिलनाचे

# आव्हान

हाडं चिरणारी किंकाळी
मनाला ओलावा आणणारी आर्तता
कंपणाऱ्या देहाला छेडणारी नियती
तडफडणाऱ्या हृदयाच्या सहिष्णुतेलाही
साद घालणारे निर्जीव डोळे
मायेच्या ओलाव्यासाठी
तडफडणारी बाळे
खपाटीस गेलेल्या पोटाचीही पर्वा न करता
साऱ्या भयानक विपत्तीला
सामोरे गेलेलं मन
जिथे मायेलाही नव्हता थारा
तिथे आशेचे बीज कोठले ?
कांही नाही ! ह्या तुडविणाऱ्या चांडाळाला
तुडवुनच पुढे गेले पाहिजे
तर ते जीवनाचं महात्म्य ठरेल
होईल त्या किंकाळीचं आव्हान !

# गुरुजनांचे ऋण

हे गुरुजनांचे ऋण, मी फेडीनच हे ऋण
हे गुरुजनां तुम्हां स्मरीतों
देई विद्या आम्हा आनंदतो
विद्या करूनी आम्ही श्रवण
आम्ही झालों मंगल नूतन
तुमचे नांव अमुच्या स्मरणात
या मम उदरतेच्या कळपात
ह्या गुरुजनांच्या आशिर्वादे
आम्हा मोठेपण प्राप्त होऊ दे
ही गुरुजनांची प्रीती
मी गाईन त्यांची किर्ती
त्यांनी केले मार्गदर्शन
आम्ही करू त्यांचे स्मरण
हीच एक अमुची आशा
हीच अमुची एक मनीषा
आता हेच माझे ध्येय, आता हीच माझी कृतज्ञता

# मिलन

हेच आता मम मनी
हेच आता तुझ्या उरी
दोन जीवांचे मिलन जहाले
छंद मनी हा मधु भरी
तू-मी जरी असता दोहीकडे
परि प्रीती स्पर्श हा उरी भरे
मधु संचयी चक्र भिरभिरे
मधु आता हृदयी धरे
हाक मारिता 'लाडके !' म्हणोनी
हीच पुकार प्रीतीची
लाडक्या म्हणोनी उत्तर देसी
हीच व्यथा ही मिलनाची
मधु पुकार पडता कानीं
मन हे अपुले होई उन्मन
दोन जीवांच्या एकजीवाचे
मधु-उदधीस्तव झाले मिलन

# वेडी आशा

काळवंडलेल्या कातरवेळी
भकाभक निश्वास टाकत
असलेली खोपटी
जीवनाच्या वणवणतेनं शुष्क बनलेली रोपटी
मायपोटी सुखाचा घास कधी
न मिळालेली हाडाकाष्ठाची पोरं
आशेच्या पोटी जिभळ्या चाटणारी ढोरं
वणवणत्या रणरणत्या तापानं
ताप येऊन पडलेलं पोर
निर्जीव डोळ्यांची रेलचाल करणारी
भकास जीवनाची मायेची ममता
काटक्या चिंध्या नुसत्या जळतच होत्या
आशेपोटी जीवनासाठी
धुराडं धुर टाकीत होतं आस घेऊन कर्तव्याची
माय ! तात !! भूक लागली फोडीती टाहो टाहो
काय हे भीषण भूषण मायेपोटी माय ?
करीती हाय, हाय, मायेपोटी माय !!

# आलाप

मावळतीच्या एकान्ती नदीकाठी
    पश्चिम क्षितिजावर ढगांची दाटीवाटी
क्रंदणाऱ्या आलापाचे क्रौर्य
    छातीशी कवटाळून—
    आजचाही दिवस विरून जातो
मनात मात्र नैराश्याच्या काळ्याकुट्ट आठवणी
    असेच आक्रन्दणारे मन
    तडफडणाऱ्या देहावर बसणारे 'घण'
    मनोमन यातनांची गुंगी
    धगधगणाऱ्या हृदयाला
        साद घालणारी नियती
    डोळ्यात मात्र गत स्मृतीचे धुके
      पाणावते, विरून जाते
    उसासे टाकणाऱ्या देहाला
      बिलगणारे पाखरू
    मायेच्या ओलाव्यासाठी
      धडपडत असते
    आणि उंच सूरात गात असते–

# आभाळ पाऊस

आभाळ आलं पाण्याने भरून
धरती माता गेली हो मोहून

पाण्याचा थेंब पडता भूवरी
मातीचा सुवास येई कस्तुरीपरी

आभाळ आभाळ दिसे काळेभोर
शेतकरी मोती पिकवी भूवर

पाऊस पडता हसतमुख शेतकऱ्यांचे
मनी मोहूनि जाता काम करी कष्टाचे

पर्जन्याने झाले गवत हिरवे
धरतीवर डोलूनी जणू नृत्यक व्हावें

पशु जाती हिरवे गवत खाण्या
निर्झराचे नवे पाणी पिण्या

धरती गेली बहरून पुष्पाने
पुष्पाच्या सुगंधी परिमलाने

झाले सुखी जीवन धरती मातेचे
स्वरूप मिळे सर्वांना आनन्दाचे

सुखी झाली गरीब जनता
पिकवुनी शेती अन्नधान्यता

# चंद्र माझा

चंद्र माझा गे हा वेडा
घालितो वेढा जगताला—
सुवर्णाची कमळे फुलली
प्रीत अबोली धरूनी गाली
प्रतिबिंब ते लोचनी धरूनी
भाववेगे पापणी मिटली
रुणझुण रुणझुण मेघसवारी
धरूनी हाती करी गुजगोष्टी
रिझविलेस तू मम मनाला—
आज कुठे तो चन्द्र लोपला
म्हणून का रुसवा आला
कशी करूणा ये कृपाळा
कधी पाहीन भरल्या डोळा
थकलेल्यांचा तू विसावा
म्हणूनी घेती ते मागोवा
काही सुचेना काहीं रूचेना
दे विसावा मुसाफिराला—

## शलाका

चार कुडाच्या चार भिंती उभ्या होत्या
डोलारा सांभाळीत, नियतीशी संगनमत करीत
लगदा झाला होता चिखलाचा
आपलं उपरणं सांभाळीत
आकाशाच्या सपाटी, ठेवून धुक्याचं छप्पर
देत होत्या वादळवाऱ्याशी टक्कर
फाटक्या पत्रावळीच्या भरोशावर दिवस कंठीत
आम्ही जगत होतो
तोंडाला कुलुप, पाठी मुक्यामाराच्या धपाटी
झाली होती अंगाची बारीक पिसणी
आज अमुच्या गरीबीचे चालले विडंबन
कशी वदावी कुणाशी ही कहाणी करूण
श्वापदांसम बालके बनली होती, गुलाम त्यांची
बालपणीच त्यांचे काळीज करपले होते
सुसज्ज वास्तुतून पिचकाऱ्या मारीत
ते आम्हाला देत होते हुकुम
ह्या साऱ्या वस्तुस्थितीचा कठोर आसूड
साऱ्या पडझडीतूनही फडफड करतो
जगताच्या ह्या ओसाड पथावर
माणुसकीला बसली ठोकर म्हणून
काळजातले रक्त पाजोन
आजवरी तुमची भूक शमविली नाही का ?
मग नाही का तुम्हाला त्याची चाड ?

श्रद्धेच्या बळावर, पाषाणही ओघळतो
तिथे हाडामासांची माणसं तुम्ही
का काळीमा फासता माणुसकीला
नाही सहन होत आता पुरे झाली ही थट्टा
किती काळ लावणार असा जिंदगीला बट्टा
ही हाडाकाष्टाची पोरं आता
उभी राहिलीत
करूनी गाजावाजा आता थोपटलेत त्यांनी दंड
तुम्ही मग म्हणा त्याला खुशाल बंड
तिच शलाका ठाकली आहे ह्या थंड जीवनात त्यांच्या
प्रतिकार करण्या ह्या साऱ्याचा जी मार्ग दाविते अखंड
सागरामध्येही उठल्यात लाटा
तुम्हाला तडाखा द्यायला
तुमच्या आजवरच्या अन्यायाचा सूड उगवायला
दुःखाच्या झंझावातानी
फेसाळून उठता लाटांनी
ठेवली नम्रता, सोडली अहंता
धकाधकीची धग विसरून
स्वाभिमानाने केली ताठ मान
ज्वालेतही जगलो, मृत्युशीही खेळलो
जीवनातल्या अणू अणूंत
माधुकरी मागून
ह्या साऱ्या उद्वेगाला आज दूर ढकलीत
कलिकालाच्या माथ्यावरती पाय देवून
उभे राहिलो आता
मरगळलेल्या घडीला
शलाकेचा आधार समजून

# माझ्या माधवा श्रीधरा

सौख्यरवीच्या कुशल सारथे
खुळ्यापरी तू वेड पांघरून
नको जाऊ तू सोडून
माझ्या माधवा श्रीधरा ॥धृ०॥

साद घाली वेडे मन
हरपले देहभान
नको जाऊ तू सोडून
माझ्या माधवा श्रीधरा ॥१॥

सारे तुजकडे ध्यान
बघ कंठी दाटे प्राण
ध्यास तुझा मनोमन
माझ्या माधवा श्रीधरा ॥२॥

आले आभाळ भरून
ढळलेही सारे ऊन
तुजविण एक क्षण
माझ्या माधवा श्रीधरा ॥३॥

भेटील हो माझा मोहन
वेध घेती माझे लोचन
उभी सत्कारा मी सजून
माझ्या माधवा श्रीधरा ॥४॥

# निरोप

हे स्मृतीचे युगे-युगे दर्पण चोहो उभे
ऐलतटी-पैलतटी प्रतिबिंब ते शुभे
का युगा-युगाची शर्थ पाहिली भरे अपुरे मन
तम-अज्ञाना करूनी विच्छिन्न हो सुमन सिंचन ॥

हा मन्वंतरी स्मृतिडोह जो उद्रेकता पहाता
क्षणभर स्तिमित नेत्रजल दुःखात पुसता
मन माझे व्याकुळ झाले, झाले उद्विग्न
स्मृतिचित्र स्मरिता, तयातच मी मग्न ॥

गुरुदेव मार्गदर्शने वेचिली ज्ञानईश्वरी
आदर असे मनी अमुच्या, श्रद्धा भरे अंतरी
नियतच गुरुदेव आशिर्वादे जगी लाभो उच्चस्थान
हे गुरुदेवो ! दीन-अमीरतेतही गाऊ तुमचे गान ॥

तत्समयी चंचल मन होईल अमुचे शान्त
जगी स्नेहबंधन बांधण्या पडे न कशाची भ्रान्त
चरम अभिलाषा पूर्ण करी, हे गुरुदेव भवे
सौख्याचा मार्ग मोकळा सुख स्नेहमंदिर हवे ॥

नितान्त मनी श्रद्धा बसे ही तव प्रसाद असो सदा
तदपि आम्ही समृद्धीची होवो हीच प्रगति-सुधा
वंदन, त्रिवार वंदन गुरुदेवो ! हीच चरम कृतज्ञता
भावभक्तींची हीच आराधना जगी स्वप्नसुंदर प्रतिकता ॥

## एका कवितेस—

जेंव्हा तुझे ओठ
बोलण्यासाठी खुलतात
जेंव्हा तुझ्या गाली
स्मित रेखा उमटतात
जेंव्हा तुझ्या गाली येते मग लाली
लाजेस्तव हसते तुझ्या केसातील कळी
जेव्हा तुझ्या सूरांना
माझ्या गीताची साथ असते
तेव्हाच एक कविता
तुझ्या रुपी मला दिसते
जेंव्हा मज सगळे दिसू लागते व्यर्थ
तेंव्हाच कळतो ग तुझ्या कवितेचा अर्थ

## हृदयांमधील देवा

अजुन वाट चालते
 हृदयांमधील देवा ॥
प्रीती पथाला स्पर्श करण्या
अश्रु गंगा वहाते ॥धृ०॥
ओल्या नयनी दुःखद हृदयीं
 अजुनही पुढे जाते
प्रीतिगेह हरविले म्हणोनि
 मधुसंचय करण्या जाते ॥१॥
काय मन स्थिती हृदयीं देवा
 आज मी पहाते
काय कुणाशी आज हेवा
धुंदीतच मी तुज पहाते ॥२॥
हव्यास तव प्रीतीचा म्हणोनि
 अजुनही उच्च स्वरी गाते
कधी प्रीतीच्या मधुधाग्यांनी
 जुळेल कां अपुले नाते ? ॥३॥
दृष्टीपथाशी येता तू रे
 वाटे तुज कधी कुशीत घेते
प्रीतिगृही राहण्या त्वां रे
 ओठी मधुचा प्याला देते ॥४॥

## थांब पोरटी

थांब पोरटी चित्त चोरटी
अशी फिरतेस कुठे एकटी
मी आले तुज भेटाया
चल करू गुजगोष्टी ॥

आशेचा धरुनी किरण
आज जहाले मिलन
गीतांची गुणगुण
कशी चाले ओठी ॥

अपुला संग, मधुही दंग
वाऱ्याची झुळुक प्रीतीला तरंग
सांगे भाव नाव तुझे ग
नजर चित्तचोरटी ॥

रंगरूपाची पांखरण
फुलवितसे अंगण
ओशाळले गगन
या दुजांच्या भेटी ॥

## गुपित

शब्दांच्या धनुष्याने
मारले नजरेचे तीर
नजरेस नजर मिळता
भरले डोळ्यात ग नीर
आठवणीच्या शब्दांचा
वहात आला ग पूर
मिटताच का पापण्या
त्यात भिजले ग सूर
किती म्हटले क्रूर
तरी जाईना नूर
लागते वघ सारखी
मला तुझीच हुरहुर
पहाटेच्या दवबिंदूत
पहाण्या अपुले रूप
फिरत होते प्रातःकाळी
इथले सारे ग नृप
गुंजारव मधुकराचा
आणि संगीताची गोडी
फुलासंगे काढी खोडी
थट्टा करे थोडी
त्याचवेळी एक कविता
जन्मास ग येते
आणि जन्मोजन्मीचे बनते
अपुले अजोड ग नाते

## अस्मिता

उसळणारं पाणी, थकलेल्या लाटा
खडकावर फुटून, जीव देत होत्या
प्रेमळपणाला जाग यावी म्हणून
उभ्या जगाला सांगत होत्या
मुशाफिरांनो तुमची दिवास्वप्नं, स्मृती
सारं कांही मज सारखं असेल नाही ?
दंगलेल्या स्मृतीच्या मधुर लाटा
खडकावर फुटताना
जीव द्यावा वाटत असेल नाही
आज ना उद्या मला
माझं ध्येय सापडेल
म्हणून पुन्हा जीवाला शाश्वत बनवितो
मग मी का बरे जीवावर उदार होतो
ध्येय तुमचं, माणुसकीचं ध्येय
पथिकांनो !
जागृत ठेवा आणि पुढे चला

## नाही कळायचा अर्थ

नाहीं कळायचा अर्थ
तुला माझ्या भावनांचा
नाही कळायचा स्पर्श
तुला माझ्या वेदनांचा
प्रीत ही अबोल म्हणूनी
आणला मुकेपणाचा आव
विचारायचे होते म्हटले
पण राहूनच गेले नाव
प्रीत म्हणतात आंधळी
जैसा मासा जळामधी
तशी तुझी माझी भक्ती
राहिली हृदयामधी

❖ ❖ ❖

नाही सांगितले नांव
म्हणून उधळायचा कां डाव
आणि असा घालायचा का
माझ्या काळजावरी घाव
वेदना तुझी आणते
अश्रुचा ओघळ
आणि लाविते जीवाला
सारखी तळमळ
आकाशाला फुटला ऊर
नको मारु तू फुंकर
तुझ्या निळावतीत
मी बनले पाखर

# संजीवन

सुविचार सागरी बुडले
माझे मन हे सुंदर
माझिया मनान्तरी न दुःख
सदैव मोद बहर

माझ्या मनी वर्षिला प्रमोद
दाखविन मी सर्वांना
हर्ष निर्मिती करीन
देवूनी हर्ष मुलांना

जरी दुःखे आली तरी
भिणार नाही मी त्यासी
हर्ष गेह फुलवूनि
संग करीन सज्जनासी

वाईट विचारांची मी
दोस्ती नच करणार
सुविचार फुलवूनि
सुभावना निर्मिणार

ऐसे ममची हे मन
हर्षाने बहरलेले
मनी गोडवी ठेवून
सुमनानीं फुललेले

## संकेत

तुजविण एक क्षण, जरी म्हटले जीवन
तरी त्याची पर्वा तुला आहे काय
कल्पनेचा रंग तरंग घेतसे आकार
समाधानाचा सागर नाही काय ?

प्राण पाखडून मी बनविली मूर्ति
मुक्या मूर्तीला आणि भावस्फूर्ती
वेदना जागृतीची आज सले मनी
आंसू दाटल्या नयनी पहातो भोवती

थाट नाही कशाचा पण गजबजाट
स्वान्त सुखासाठी पत्करली ही वाट
तोच खेळ क्षणाचा मी मांडला समोर
जरी आणलेस मनी तर दे ढकलून दूर

व्यथा ही न्हाहते आज अश्रूत तुझिया
उरी अश्रुंचा पूर आज झाकू कुठे
आनंदे नटून छोटे घरकुल थाटून
बगीच्यांतील गुलाबांचे झेलू काटे

नको आडकाठी, नको कुणाची मुजोरी
घेऊ रानपाखरासवे स्वच्छंद भरारी
बघ दाही दिशांतून येई ललकारी
ऋतू वसंत फुलला अपुल्या अंतरी

## मी

मी शेंबडं पोर आहे
असेन कदाचित ( तुमच्या दृष्टीनं )
आला असेल शेंबूड
 क्वचित क्वचित

मी शेंबडं पोर आहे
पण नाही मी लाचार
तुमच्या भिकेच्या तुकड्यावर
नाही मी जगणार

किती थट्टा करता
 जीवनाशी खेळता
तुमच्या पायाचा चिखल समजून
तुम्ही किती लाथाडता

अरे आसमंतही साक्षी आहे
तुमची ढोंगं सांगायला
आणि धरणी विखुरली आहे
तुमची माती करायला

झालय असह्य सगळं
आणलय अंगी बळ
जरी उठले तुमच्या चाबकाचे
पाठीवर वळ

पर्वाच करणार नाही आता
तुमच्या अरेरावीची
हीच आहे भाषा
आता ह्या रवीची

आजवरी दिली आम्ही
आसवांना वाट
अन् ठेवले होते
बंद करून ओठ

पण जीवनाच्या प्रवाहात
आता आली आहे लाट
गरीबांचे अश्रु पुसण्या
आता उगारलेत हात

मग खुश्शाल म्हणा तुम्ही
लाळ आणून आपल्या जिभेवर
हे शेंबडं पोर
करून तरी काय करणार

## प्रीती

गे सखी उघडले प्रीतीचे द्वार ॥धृ०॥
स्मृतीच्या पंखाने उडूनी
करू प्रीतीचा संचार ॥
प्रलोभन मज तव प्रीतीचा
करीशी हास्य तुषार ॥
तव प्रीतीचे भान हरपता
सखे ! वाहे मौक्तिक धार ॥
स्वप्नात पाहिली प्रीती-निशा
सखी कां होता अंधार ? ॥
फुलवीत होतीस फुलासवे तू
होय सखी प्रीतीचे कोठार ॥
छन्द मनी हा मधु भरिला
ह्या मधुला येईल बहार ॥
फुलासवे तू फूल बनूनी
कर सखीं ग प्रीतीचा शृंगार ॥

★

## मागणे

आस्था तुझ्या एकीची
सदा घेतसे ओढ
जरी म्हटले सोड
तरी जाईना खोड
आतातरी साजनी तू
बोल माझ्याशी गोड

## मनोगत

मी तर केवळ स्वप्नवेडा
नको झुरु तू माझ्यासाठी
नको ठोकरू सुखमापटे
        शुन्य फक्त गे माझ्यासाठी
महाल माझ्या केवळ स्वप्नी
        झोपडेच गे सत्यस्वरूपी
नाजुक तुझ्या देहलतेला
        सहायाची ना बोजड खोपी
मऊमखमली स्वप्नमालेला
        वास्तवतेचे असतीं काटे
जरी आले मनी तरी मी कसा
म्हणू तुला तू भेटशील कोठे
कोमल काया, नाजूक छाया
        मदनाची तू मदन मंजिरी
सोन्याच्या मृदुमखरामध्ये
        दिसशी तू प्रिये साजिरी

## तेच खरे वीर

जगाच्या पाठीवर
असे किती आले गेले
पण त्यातूनही जे उरले
तेच खरे वीर

घास अपुल्या मुखीचा
घातला मुखी दुसऱ्याच्या
अन जे बनले अपुल्या
जीवावर उदार
तेच खरे वीर

ज्यांचे सर्वस्व गेले
अन जे त्यांचे झाले
असहायनां ज्यांनी
उघडे ठेविले दार
तेच खरे वीर

दया क्षमा याचना
यांची केली नाही वंचना
जे जे वंचित होते त्यांचा
ज्यांनी घेतला पुढाकार
तेच खरे वीर

ज्यांच्या वर्चस्वाची शिकार
बनले गरीब बेजार
हिंमतही न हारता ज्यांनी
तया मारीली ठोकर
तेच खरे वीर

काऱ्यामधुन ज्यांनी
मार्ग केला पार
लोकनिंदेलाही ज्यांनी
खाल्ली नाही हार
तेच खरे वीर

अविश्रांत दिनरात
जे दुसऱ्यासाठी राबले
ज्यांनी रस्त्यातले
केले दगड दूर
तेच खरे वीर

## देवाचं देणं

देवाचं देणं
असतं कोरीव लेणं
पहाताक्षणी
दिसतं लाजिरवाणं
तसं तुझं मन
पण काही क्षण
उगीचच भासतं
मला सुनं सुनं

## जेव्हां तू रुसतेस—

जेव्हां तू रूसतेस तेव्हा
आकाश झुकलेले असते खाली
पहाटेच्या पापणीवरच्या दवबिंदूत
पहात असते अपुले रूप
जेव्हां तू रूसतेस तेव्हा
हळूवार कुरवाळीत असतो वारा
बकुळीच्या नाजूक ओठावरची जखम
तू जेव्हां रूसतेस तेव्हां
मरणहि वाकुल्या दाखवीते
जीवनाच्या उनाड पक्षाला
आणि......जेव्हा तू हसतेस तेव्हां...
खरं सांगू —
क्रुसावरच्या येशुची
वेदनाहि सुखावते
आणि
अश्वत्थामाच्या हातातील
तेलाची वाटी गळून पडते

## परीक्षा तुझ्या अस्मितेचा

विषाची परीक्षा
कधीच मी केलीय
आणि सुखशांती केवळ
तुझ्यासाठी ठेवलीय
    जन्मोजन्मीचे अपुले
    हे नाते समजून
    सदा घेतले तुला मी
    देवाजवळ मागून
आले प्रहार मी
उराशी झेललेत
वसंतातले तुझे
समजून गीत
    रुसलीस तू अनेकदा
    भावसुमांच्या जाणीवेनं
    आणि ओघानेच त्यामुळे
    पाणावले माझे नयन
लाखात असं तुझं मन
शोधून मिळणार नाही
आणि मी ही असा हळवा
शोधून सापडणार नाही
    प्रथमदर्शनीच मी
    तुझं मन ओळखलं
    आणि आपुलकीच्या जाणिवेनं
    मी तुझ्याकडे पाहिलं
काय चुकलं त्यात माझं
तूच सांग आता मला
नाहीतर मार माझ्या हृदयी
पत्थराचा जबरदस्त टोला

## रुसवा धरुनी

रुसवा धरुनी गाली तू झालीस कां अबोल
सोडूनी तुझी ही खंत, आतातरी साजणी बोल

वेदना कोण साही, काटा रुते कुणाला
भाव तुझ्या मनीचा, का उमलीत मज आला

चंद्रापरी ग मी ही, तू चांदणी नभीची
पहाताच जडली, ही प्रीत आरंभीची

तू मी जरी दोन, आहे अंतर्यामी एक
आतातरी साजणी तू, माझे जरा ऐक

लागता तुझा छंद, होई नजर बंद
धरुनी भाव चित्ती, सखे उधळीत ये गंध

# वेडी कुठली

सोड तुझे बहाणे
जा भरुन चैतन्याने
ताजेपणाने
वेडीच कुठली तू
बसलीस शुन्यात
फुकट घालवू नको जीवन
हुंदके हे देण्यात
जरी सुकल्या कळ्या
तरी बनतील माळा
जर असेल ठायी
भरला भक्तीचा उमाळा
पाहून तुझे ते
रुसणे लाजरे
आकाशातले
हसले तारे
माझ्याही गाली
हसू आलं
आणि मी तूला
वेडी म्हटलं

२३२५ ७।०४
२१९८८

# हृदय हवे मज

२३२६ २।।२०
२१९८८

सांगू काय मनी दाटे
    शब्द पडताती थिटे
उरीं भावनांचा पूर
    कसा दाखवू तुला कुठे
काळजात कळ येते
    तुझी आठवण होता
शब्द ऐकण्यास तुझे
    लागते आतुरता
तुझ्या स्मृतीचे ढग
    डोळ्यापुढून सरता
मनी जळते ओघळते
    नयनी अश्रु सरिता
नाही रे राजा परत
    नाही करणार चेष्टा
घास तुझ्या ताटातील
    खाईन मी उष्टा
...ऱ्याची ओढ
    मी कधीची रे सोडलीय
...कुटी तुझी रे
    मी मनी सजवलीय
नाही रे मला
    तुझ्या गरीबीची लाज
लाख शिव्या देवो मग
    आज हा समाज
तुझ्या चरणाची धूळ
    राजा आहे अनमोल
की त्यातही आहे
    माझ्या जिंदगींचे मोल

REFBK-0021987
REFBK-0021987



शलाका